# पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील
# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१७-१८ प्रसिध्दी निवेदन
# दि.०८.०९.२०१७. (दुसरी विशेष फेरी)

**इ. ११वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१७-१८ साठी दुस-या विशेष फेरीतील गुणवत्ता यादी दिनांक ०८.०९.२०१७ रोजी जाहिर झाली आहे.**

**इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिये द्वारा कला, विज्ञान, वाणिज्य व एमसीव्हीसी (HSVC)या शाखेत प्रवेश दिले जाणार आहेत.**

**दुस-या विशेष फेरी गुणवत्ता यादीनुसार सांख्यिकी माहिती**

| अ.क्र. | तपशिल | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | दुस-या विशेष फेरीतील गुणवत्ता यादीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज | २४५१ |
| २ | दुस-या विशेष फेरीतील गुणवत्ता यादीत दिलेले प्रवेश | १८०७ |
| ३ | पहिला पसंतीक्रम मिळालेले विद्यार्थी | ११२४ |
| ३ | दुस-या विशेष फेरीतील गुणवत्ता यादीत दिलेल्या पसंतीक्रमानुसार प्रवेश न मिळालेले विद्यार्थी संख्या | ६४४ |

कला, विज्ञान, वाणिज्य व एमसीव्हीसी (MCVC) शाखा (मराठी व इंग्रजी माध्यम) साठी जेवढया प्रवेश इच्छुकांनी अर्ज केला होता. त्यांना पहिल्या विशेष फेरीतील गुणवत्ता यादीत शाखा व माध्यमनिहाय आलेल्या प्रवेश अर्जानुसार व विद्यार्थ्यांनी दिलेल्या पसंती क्रमांक व गुणवत्तेनुसार पसंतीक्रमनिहाय सांख्यिकी माहिती (१ ते १० पसंतीक्रम) :-

| शाखा | माध्यम | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कला/ विज्ञान/ वाणिज्य/ एमसीव्हीसी (MCVC) | /मराठी /इंग्रजी | ११२४ | २४० | ११० | ९० | ८० | ५८ | ३३ | ३२ | २४ | १६ | १८०७ |
| | एकूण | ११२४ | २४० | ११० | ९० | ८० | ५८ | ३३ | ३२ | २४ | १६ | १८०७ |

**दुस-या विशेष फेरीतील गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश देण्याचे वेळापत्रक पुढील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियेबाबत तपाशिल |
|---|---|---|---|
| १ | ०८.०९.२०१७ | दुपारी २.०० वाजता | केंद्रीय प्रवेशाची दुस-या विशेष फेरीतील गुणवत्ता यादी जाहिर करणे |
| २ | ८.०९.२०१७ | दु. २.०० ते ५.०० वाजेपर्यंत | १. केंद्रीय प्रवेशाच्या दुस-या विशेष फेरी गुणवत्ता यादीतील प्रवेश घेणे.<br>२. सर्व प्रकारच्या कोटा प्रवेश रिक्त जागांवर प्रवेश घेणेसाठी ऑनलाईन ॲडमिशन पॅनल सुरु राहणार आहे, अद्यापपर्यंत ज्यांनी कोठेही प्रवेश घेतलेला नाही असे विद्यार्थी कोटयातील या रिक्त जागांवर प्रत्यक्ष कॉलेजमध्ये जाऊन प्रवेश घेऊ शकतील. |
| | ०९.०९.२०१७ | सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत | |
| | ११.०९.२०१७ | सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत | |

**विद्यार्थी पालकांसाठी सूचना:-**

१) दुस-या विशेष फेरीमध्ये कॉलेज ॲलॉट झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या पसंतीचे कनिष्ठ महाविद्यालय मिळालेले असल्यास **दि ०८.०९.२०१७ दु.२.०० ते ५.०० वाजेपर्यंत व दि.०९.०९.२०१७ व ११.०९.२०१७ (सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत)** कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश ऑनलाईन निश्चित करावा.

२) प्रवेशाच्या वेळी आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

**कनिष्ठ महाविद्यालयांसाठी सूचना :-**

१) आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात ऑनलाईन ॲलॉट झालेल्या यादीप्रमाणे विद्यार्थी/पालक कॉलेजमध्ये आल्यानंतरच त्यांचे प्रवेश नियोजित वेळेत ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे.

२) विद्यार्थी किंवा पालक कॉलेज मध्ये प्रवेशासाठी न आल्यास, आवश्यक ती कागदपत्रे सादर न करताच कोणत्याही विद्यार्थ्याला परस्पर ऑनलाईन ॲडमिट करु नये.

३) ज्या विद्यार्थ्यांना दुस-या विशेष फेरी मध्ये सहभागी होता आलेले नाही, अथवा ज्यांना प्रवेश मिळालेले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी पुढील प्रवेश प्रक्रियेबाबतच्या सूचना दि. ११.०९.२०१७ नंतर इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या संकेतस्थळावर व पुणे-पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील वर्तमानपत्रात प्रसिध्द केल्या जातील.

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

MRaut 8.9.17

(मिनाक्षी राऊत)
सदस्य सचिव,
इ . 11 वी ऑनलाईन केंद्रिय प्रवेश नियंत्रण समिती,पुणे
तथा
सहा. शिक्षण संचालक,
पुणे विभाग पुणे-१